महा मेट्रो
PUNE METRO

**पुणे मेट्रोने साडेतीन महिन्यात ओलांडला १० लाख प्रवासी संख्येचा टप्पा**




**Date: 17th June 2022**

महामेट्रोच्या पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम प्रगती पथावर असून पुणे मेट्रोने आज शनिवार, दिनांक १८/०६/२०२२ रोजी अजून एक महत्वाचा टप्पा पार केला आहे. दिनांक ६ मार्च २०२२ रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे मेट्रो प्रकल्पाच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते फुगेवाडी स्थानक आणि वनाझ स्थानक ते गरवारे कॉलेज स्थानक या १२ किमीच्या २ मार्गिकांचे लोकार्पण करण्यात आले. तेंव्हापासून आजपर्यंत गेल्या साडेतीन महिन्यांत या मार्गिकांवर पुणे मेट्रोने १० लाख प्रवासी संख्येचा टप्पा पूर्ण केला आहे आणि आपल्या शिरपेचात अजून एक मनाचा तुरा खोवला आहे.

पुणे मेट्रोला हा १० लाख प्रवासी संख्येचा टप्पा ओलांडण्यासाठी दोन्ही मार्गांवर एकूण ५५८१ फेऱ्या कराव्या लागल्या आहेत. यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते फुगेवाडी स्थानक २४८३ फेऱ्या व वनाझ स्थानक ते गरवारे कॉलेज स्थानक ३०९८ फेऱ्या यांचा समावेश आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते फुगेवाडी स्थानक या फेऱ्यांचे एकूण अंतर ३५०५९.९६ किमी, तर वनाझ स्थानक ते गरवारे कॉलेज स्थानक या फेऱ्यांचे एकूण अंतर ३०७३२.१६ किमी आहे. पुणे मेट्रो ही विजेच्या सहाय्याने धावत असून मेट्रोला १ किमी अंतर पार करण्यासाठी साधारणतः ५ युनिट विज लागते, याचा साधारणतः खर्च ४० रुपये येतो. पुणे मेट्रोने या साडेतीन महिन्यात **१,४७,८०,८८२** रु. इतके उत्पन्न मिळवले आहे.

पुणे मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. उर्वरित उन्नत मार्गांची कामे डिसेंबर २०२२ पर्यंत करण्याचे नियोजन केले आहे. या व्यतिरिक्त सर्व भुयारी मार्गांसह संपूर्ण मेट्रोची कामे एप्रिल २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.




याप्रसंगी महा मेट्रोचे संचालक डॉ. ब्रीजेश दिक्षीत यांनी आनंद व्यक्त केला आहे की, "आजची दशलक्ष प्रवासी संख्या पुणेकरांच्या उदंड उत्साहामुळे शक्य झाला आहे. पुणेकरांच्या उत्स्फूर्त सहगोयामुळे पुणे मेट्रोला ७५ टक्के काम पूर्ण करणे व अशंतः मार्ग प्रवाशांसाठी खुला करणे शक्य झाले आहे. पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व सर्व शासकीय विभागांच्या सहयोगामुळे लवकरच पुणे मेट्रोचे उर्वरित टप्पे प्रवाशांसाठी खुले करण्यात येतील."

पुणेकर श्रीमती तनुश्री पाटील या पुणे मेट्रोने प्रवास करणाऱ्या दशलक्षव्या व्यक्ती ठरल्या आहेत. याप्रसंगी पुणे मेट्रोतर्फे त्यांना "महामेट्रो ट्रॅव्हल कार्ड" व बक्षिस देण्यात येणार आहे.

पुणे मेट्रोने या आनंदाच्या क्षणात पुण्याच्या नागरिकांना व आपल्या प्रवाश्यांना सहभागी करून घेण्याचे ठरवले आहे. यासाठी पुणे मेट्रो शनिवार, दिनांक १८/०६/२०२२ या दिवशी सायंकाळी गरवारे कॉलज मेट्रो स्थानक व रविवार, १९/०६/२०२२ या दिवशी पिंपरी चिंचवड महानगरपालिका मेट्रो स्थानक येथे विविध उपक्रम घेणार आहे. १० लाख प्रवासी संख्येचा टप्पा पार झाल्यामुळे पुणे मेट्रो प्रवाश्यांसाठी "सेलिब्रेशन ऑन व्हील" ही नवीन संकल्पना आणली आहे. यासाठी नागरिकांनी ७ दिवस आधी मेट्रो आरक्षित करणे गरजेचे आहे.